अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शुक्रवार
१६.१०.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

वर्ष: ०७ | अंक: २५७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712
+91 7745067712

## थोडक्यात

### धर्मांतरानंतर आरक्षण मिळणार का? सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – धर्मांतर केलेल्या व्यक्तीला पूर्वीच्या धर्मातील सामाजिक मागासलेपणाच्या आधारे आरक्षण किंवा विशेष सवलतींचा दावा करता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. हिंदू धर्म सोडून इतर धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीस पूर्वधर्मातील मागासलेपणाच्या आधारे मागासवर्गीय दर्जा मिळवता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे. न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला असून, यामुळे धर्मांतर आणि आरक्षणाच्या कायदेशीर निकषांवर नवीन चर्चा सुरू झाली आहे.

## ‘अखेर मनातलं ओठांवर आलंच, हा सगळा खेळ...’

### प्रशांत भूषण यांचा व्हिडीओ शेअर करत मुख्यमंत्री फडणवीस यांचा विरोधकांवर हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – दिल्लीमध्ये सुरू असलेल्या आंदोलनांवरून देशातील राजकीय वातावरण तापले असून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली आहे. विद्यार्थ्यांचे आणि शेतकऱ्यांचे प्रश्न पुढे करून तसेच जाती, धर्म आणि भाषेच्या मुद्द्यांवरून समाजात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. या आंदोलनांमागे जनहितापेक्षा सत्ताप्राप्तीचा उद्देश असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. दरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही काँग्रेस आणि त्यांच्या सहकारी पक्षांवर टीका करत विरोधक तरुणांची दिशाभूल करीत असल्याचा आरोप केला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांचा एक व्हिडीओ समाजमाध्यमांवर शेअर केला. या व्हिडीओच्या संदर्भातून त्यांनी दिल्लीतील आंदोलनांवर आणि विरोधकांच्या राजकीय भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या समस्यांचा आधार घेऊन राजकीय वातावरण तापविणे, जातीय तसेच भाषिक मुद्द्यांवरून समाजात तेढ निर्माण करणे आणि घटनात्मक संस्थांविषयी जनतेच्या मनात अविश्वास निर्माण करणे, असे प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

फडणवीस यांच्या मते, आंदोलनांच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्याऐवजी सत्तेच्या राजकारणाला प्राधान्य दिले जात आहे. देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत त्यांनी विरोधी पक्षांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना आणि शेतकऱ्यांना आंदोलनासाठी प्रवृत्त करणे, जाती व भाषेच्या मुद्द्यांवरून द्वेष पसरविणे आणि देशातील प्रतिष्ठित संस्थांची प्रतिमा मलिन करणे, हे सत्तेसाठी सुरू असलेल्या राजकारणाचे भाग असल्याचा दावा त्यांनी केला.

आंदोलनांच्या उद्देशावरून सत्ताधारी–विरोधकांमध्ये आरोप–प्रत्यारोप लोकशाही व्यवस्थेत आंदोलनांना महत्त्वाचे स्थान आहे. नागरिकांच्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचविणे, धोरणांमधील त्रुटी दाखवून देणे आणि अन्यायाविरोधात आवाज उठविणे यासाठी आंदोलने केली जातात. मात्र, आंदोलनांच्या माध्यमातून समाजात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्यास त्याची दखल घेणे आवश्यक असल्याची भूमिका फडणवीस यांनी मांडली.

## रिलायन्सचा मोठा निर्णय : जीओ आयपीओ प्राईस बँड जाहीर, भागधारकांना विशेष लाभ!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्स इंडस्ट्रीजची डिजिटल आणि टेलिकॉम कंपनी जिओ प्लॅटफ फॉर्म्सचा प्रस्तावित आयपीओ सध्या चर्चेत आहे. ३०,१८८ कोटी रुपयांचा हा इश्यू आकाराच्या बाबतीत भारतीय शेअर बाजारातील आतापर्यंतचा सर्वात मोठा आयपीओ ठरू शकतो. या इश्यूमध्ये गुंतवणूक करण्यासाठी देशांतर्गत तसेच परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी स्वारस्य दाखवल्याचे वृत्त आहे.

ह्युंदाईचा विक्रम मोडण्याची शक्यता जिओ प्लॅटफ फॉर्म्सचा प्रस्तावित आयपीओ बाजारात आल्यास देशातील सर्वात मोठ्या आयपीओचा विद्यमान विक्रम मागे पडू शकतो. सध्या हा विक्रम ह्युंदाई मोटर इंडियाच्या नावावर आहे. कंपनीने २०२४ मध्ये २७,८५९ कोटी रुपयांचा आयपीओ आणला होता. जिओ प्लॅटफ फॉर्म्सचा प्रस्तावित इश्यू ३०,१८८ कोटी रुपयांचा असल्याने त्याचा आकार ह्युंदाईच्या आयपीओपेक्षा मोठा असेल.




या आयपीओचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यात ऑफर फॉर सेल नसल्याचे वृत्त आहे. म्हणजेच विद्यमान भागधारकांकडून शेअर्स विकण्याऐवजी कंपनी नवीन इक्विटी शेअर्स जारी करून निधी उभारणार आहे. प्रस्तावित योजनेनुसार, कंपनी २७ कोटींपर्यंत नवीन शेअर्स जारी करणार आहे. जागतिक आणि भारतीय गुंतवणूकदारांचे लक्ष मिळालेल्या वृत्तानुसार, जिओ प्लॅटफ फॉर्म्सच्या आयपीओच्या अँकर बुकमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अनेक मोठ्या संस्थांनी स्वारस्य दाखवले आहे. यामध्ये ब्लॅकरॉक, अलायन्झ, सिंगापूरचा सरकारी गुंतवणूक निधी ऋखउ, फिडेलिटी आणि नॉर्वेचा गव्हर्नमेंट पेन्शन फंड ग्लोबल यांसारख्या संस्थांचा समावेश असल्याचे वृत्त आहे.

## एफडीएचा निर्णय बचत गटांसाठी ‘तिखट’च : सुट्या मसाला विक्रीवर बंदी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) सुट्या मसाल्यांच्या विक्रीविरोधात सुरू केलेल्या कारवाईचा निर्णय हा बचत गट, लहान विक्रेत्यांसाठी तिखट ठरणार आहे, तर दुसरीकडे, वाशी येथील एपीएमसीमधील घाऊक व्यापाऱ्यांच्या मते, त्यांच्या व्यवसायावर या निर्णयाचा फारसा परिणाम होणार नाही. घाऊक विक्रीमध्ये पॅकबंद मसाल्यांचे प्रमाण अधिक



असले, तरी मुंबई महानगर प्रदेशात किरकोळ विक्री होणाऱ्या मसाल्यांपैकी अंदाजे १० ते १५ टक्के मसाले सुट्या स्वरूपात विकले जातात. या प्रदेशातील मसाल्यांचा वार्षिक व्यापार सुमारे आठ हजार कोटी रुपयांचा आहे. ग्रोमाचे अध्यक्ष भीमजी भानुशाली यांनी हा निर्णय मागे घेतला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## ‘माझी बहीण बंडखोर वृत्तीची!’ खासदार अनिल बोंडे यांची संगीता शिंदे यांच्या बंडखोरीवर प्रतिक्रिया

### शिक्षक मतदारसंघातील बंडखोरीवरुन भाजप खासदारांचे भाष्य : पक्षशिस्त मोडणाऱ्यांवर शिवसेनेनेही कारवाई करावी, बोंडे यांची भूमिका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – पुणे येथील सचिन सानप हे बंडखोर होते. परंतु आता शिवसेनेने त्यांना पाठिंबा दिला आहे. सचिन सानप यांनी जे आव्हान केलं होते की शिक्षकांनी फक्त शिक्षकानाच मतदान करावं त्याचाही हा परिणाम असू शकतो. मात्र हा जो पाठिंबा देण्याचा प्रश्न आहे तो पक्षाचा आहे. यासंदर्भात निश्चितच वरिष्ठ नेत्यांचं बोलणं झालं असेल. अमरावतीमध्ये सुद्धा शिवसेनेचा अधिकृत उमेदवार असूनही बंडखोर उमेदवार देशपांडे आहे. पण भाजप



बेशिस्त कधीही खपवून घेणार नाही. भाजपने तीन उमेदवार आणि एक महामंत्री यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. अशीच कारवाई शिवसेनेने सुद्धा करायला हवी. अशी प्रतिक्रिया भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी दिली आहे. तर सख्ख्या भगिनी संगीता शिंदे यांच्या बंडखोरी बाबतदेखील खासदार अनिल बोंडे यांनी प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे.

**पक्षातून हकालपट्टी तरीही रिंगणात कायम राहण्याचा निर्धार**

अमरावती शिक्षक मतदार संघात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार शेखर भोयर आणि संगीता शिंदे यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवसेनेचे किरण सरनाईक यांच्या विरोधात बंडखोरी करत आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला. यामुळे भारतीय जनता पक्षाने शेखर भोयर आणि संगीता शिंदे यांची हकालपट्टी केली, तरीही बंडखोर उमेदवार मात्र निवडणूक रिंगणात कायम राहण्याचा निर्धार केला आहे. हे दोघेही बंडखोर उमेदवार भाजपच्या नेत्यांचे सख्खे नातेवाईक आहे हे विशेष.

बंडखोर उमेदवार असलेले भोयर आणि शिंदे या दोघांनी प्रतिक्रिया दिली असता, शेखर भोयर म्हणाले की, मी शिक्षकांच्या प्रश्नासाठी हितासाठी बंडखोरी केली, मी अन्यायाविरुद्ध, न्याय हक्कासाठी बंड करणारा माणूस आहे, पक्षाने निलंबित केले ती पक्षाची भूमिका आहे. विशेष म्हणजे शेखर भोयर हे तीवसा मतदारसंघाचे भाजप आमदार राजेश वानखडे यांचे मेहुणे आहेत.

> **माझी बहीण बंडखोर वृत्तीची, तिचे निर्णय ती स्वतः घेत असते**
>
> “ माझी बहीण बंडखोर वृत्तीची आहे. तिचे निर्णय ती स्वतः घेत असते. तिनं तिचं लग्न स्वतःच्या पसंतीने केलं, संसारही चांगला सुरू आहे. महिलांमध्ये बंडखोरी ही वाखण्यासारखे आहे. बहिणीला सदिच्छा असतातच. पण मी पक्षाचा प्रामाणिक कार्यकर्ता आहे. पक्षाकडून आलेले निर्देश येतील त्याच मी पालण करेल. असेही खासदार अनिल बोंडे म्हणाले. तर अमरावतीमध्ये मैत्रीपूर्ण लढतीत निर्णय हे वरिष्ठ नेते घेतील. महाराष्ट्रमध्ये सगळे महायुतीचे उमेदवार हे निवडून येतील आणि तसा प्रयत्न आमचा सुरू असल्याचेही खासदार बोंडे म्हणाले.

## तुटपुंज्या अग्रीम मदतीवरुन तीव्र नाराजी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यभरात दुष्काळाची भीषण दाहकता दिवसागणिक वाढत असल्याचे चित्र आहे. त्याचा थेट फटका आता बळीराजाला बसत असून शेतकरी आता शासनाच्या भरीव मदतीकडे डोळे लावून आहे. अशातच धाराशिवमध्ये (उ्हरीरीहर्ळीं) एका शेतकऱ्याने दीड एकरात पेरलेल्या सोयाबीनला (ड्रेलशरप) फक्त साठ किलो सोयाबीनचे उत्पन्न झाले आणि हेच सोयाबीन मार्केटला घातले असता त्याचे ३९०० एवढी पट्टी आली. या संतापातून आणि हतबलतेतून बळीराजाने हीच ३९०० रुपये आणि मित्राकडून ११०० रुपये गोळा करत सरकारला पाच हजार रुपयांची मनी ऑर्डर पाठवली आहे. धाराशिव तालुक्यातील सुर्डी गावातील चांद शेख या शेतकऱ्याने तुटपुंज्या अग्रीम मदतीवर नाराजी व्यक्त करत अनोख्या पद्धतीने निषेध केलाय.



तर दुसरीकडे पाच हजारांची मदत हा केवळ पहिला टप्पा असून दुष्काळी मदतीवरून विरोधकांच्या टीकेला राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी प्रत्युत्तर देत भाष्य केलं आहे. दुष्काळाची भीषणता



एम.के.एम. इंग्लिश स्कूल येथे

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – हयुमन वेल्फेअर ॲन्ड एज्युकेशन सोसायटी वरुड यांच्या वतीने तसेच एम.के.एम. इंग्लिश स्कूल येथे 'मिसाईल मॅन' म्हणुन ओळखले जाणारे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या




अध्यक्षस्थानी ह्यूमन वेलफेयर ॲन्ड एज्युकेशन सोसायटीचे शाहिद रशीद होते. प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य अजहरुद्दीन काजी आणि उपप्राचार्या आलिया नाजिम कुरेशी यांचा समावेश होता. याप्रसंगी अब्दुल बासित, हाफिज लाइक, शमशाद जहाँ आणि सर्व शिक्षक होते. कार्यक्रमाचे आयोजन हिना काजी, संचालन मेहविश फैयाज अहमद आणि आलिया अनम मोहम्मद शफी यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर करून त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उजाळा दिला. माहिन शेख आणि आयेशा फिरदौस यांनीही भाषणातून कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग मांडले. विद्यार्थ्यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रयोग व भूमिकानाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच सीरत फातिमा वसीम काजी यानी कलमांच रोल केला. डॉ. कलाम यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहणे, कठोर परिश्रम करणे, शिक्षणाला महत्त्व देणे आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देणे यांची प्रेरणा घ्यावी, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# बोगस 'हवामानतज्ज्ञां'ना आवरा!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – यंदा पावसाने दगा दिला, हे खरे. पण शेतकऱ्याला फसवले ते फक्त पावसाने नाही. मोबाईलवर रोज येणाऱ्या 'पक्क्या' अंदाजांनीही त्याची फसगत केली. 'अमुक तारखेपासून राज्यभर धो-धो पाऊस', 'यंदा पाऊस भरपूर, पेरणीची घाई करा' असे संदेश, ध्वनिफिती आणि व्हिडीओ व्हॉट्सॲपवरून गावागावांत फिरत होते. त्यावर भरवसा ठेवून अनेकांनी उसनवारी करून बियाणे-खते आणली आणि पेरण्या उरकल्या. पाऊस काही आला नाही. काहींवर दुबार पेरणीची वेळ आली, तर काहींनी उभ्या पिकात नांगर फिरवला. स्वतःला हवामानतज्ज्ञ म्हणवणाऱ्या काही मंडळींचे अंदाज यंदा सपशेल फसले. पावसाळ्याच्या सुरुवातीला भरपूर पावसाची हमी देणाऱ्यांनीच सप्टेंबरअखेरीस अंदाज चुकल्याचे मान्य केले. आता ते दुष्काळ पडणार, असे सांगू लागले आहेत. विदर्भात तर दिवसातून चार-चार वेळा अंदाज बदलले गेले. सकाळी एक, दुपारी दुसरा, रात्री तिसराच. पिकाला पाणी द्यायचे की फवारणी करायची, हेच शेतकऱ्याला कळेनासे झाले. मानोरा परिसरात अशा तथाकथित अभ्यासकांवर कारवाई करा, अशी मागणी आता उघडपणे होऊ लागली आहे.

नगरसेवक तारेश उर्फ तुषार देशमुख यांच्या निवासस्थानी

# खासदार अमर काळे यांची सदिच्छा भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक तारेश उर्फ तुषार देशमुख यांच्या बसस्थानक नजीकच्या निवासस्थानी भेट देवुन शहराच्या विकासासंदर्भात सविस्तर चर्चा केली.

या भेटीदरम्यान नरखेड ते बडनेरा हा रेल्वेमार्ग नागपूरमार्गे वरुडपर्यंत वाढविण्याचा मुद्दा प्रामुख्याने उपस्थित करण्यात आला. नरखेड ते भुसावळ दरम्यान करोना काळात बंद झालेली प्रवासी रेल्वेसेवा अमरावतीमार्गे पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. या रेल्वे सेवेमुळे परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळु शकतो. त्यामुळे संबंधित मागण्यांचा पाठपुरावा रेल्वे





प्रशासनाकडे करण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. खासदार अमर काळे यांनी रेल्वेच्या प्रश्नांबाबत पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगितले. या मागण्यांमुळे वरुड व परिसरातील नागरिकांना रेल्वे प्रवासाच्या अधिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते.

यावेळी माजी नगरसेवक महेंद्र देशमुख, युवा उद्योजक शैलेश देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. सदर भेटीत स्थानिक विकासाच्या प्रश्नांवर विचारविनिमय करण्यात आला. वरुड शहराच्या विकासाला गती देण्यासाठी तसेच नागरिकांच्या मूलभूत समस्या मार्गी लावण्यासाठी लोकप्रतिनिधींनी समन्वयाने प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# भविष्याच्या सुरक्षिततेसाठी इंटरनेटचा काळजीपूर्वक वापर आवश्यक

ऑपरेशन कवच जनजागृती कार्यक्रमात ठाणेदार राहुल गवई यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – भविष्याच्या सुरक्षिततेसाठी इंटरनेटचा काळजीपूर्वक वापर आवश्यक आहे, सायबर गुन्ह्यांमुळे तरुण-तरुणींचे आयुष्य कसे उध्वस्त होतात, त्यामुळे सुरक्षित भविष्यासाठी काळजीपूर्वक सोशल मीडियाचा वापर करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ठाणेदार राहुल गवई यांनी केले.

ते येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, पोलीस




स्टेशन व श्री.एन.जी. मोघे कनिष्ठ महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात ऑपरेशन कवच अंतर्गत 'सायबर गुन्हे आणि विद्यार्थी जागरूकता' या विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला, त्यावेळी बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री.एन.जी'मोघे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मनोहर गणोरकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन ठाणेदार राहुल गवई उपस्थीत होते. प्रमुख अतिथी म्हणुन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर, प्रा.संजय अकर्ते, प्रा.नंदकिशोर भडके, डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे, डॉ.दिनेश खेरडे उपस्थित होते. सहायक कार्यक्रमाधिकारी डॉ.तिलकचंद धोटे यांनी प्रास्ताविक करून सायबर सुरक्षा कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विषद केली.

प्राचार्य मनोहर गणोरकर यांनी अध्यक्षीय मनोगतातून तरुण-तरुणींनी सोशल मीडिया वापरताना खबरदारी घेतली पाहिजे. सोशल मीडियातून झालेल्या प्रेमातून आजच्या तरुणी उद्धवस्त होत आहेत. मोबाईल हे दुधारी शस्त्र आहे.त्याचा योग्य व काळजीपूर्वक वापर करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अविनाश धोबे तर आभार डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे यांनी मानले. कार्यक्रमाला वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जामनेर-बोदवड मार्गावरील अपघातात ६ ठार

मालदाभाडीजवळ ट्रकची दुचाकीला धडक, मृतांमध्ये ३ बालकांचा समावेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***जामगाव*** – जामनेर-बोदवड रस्त्यावरील मालदाभाडी फाट्याजवळ ट्रक आणि दुचाकीच्या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील पाच जणांचा समावेश असून, तीन महिन्यांच्या बाळाचाही मृत्यू झाला.



सर्व मृत मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर जिल्ह्यातील मालची तांडा येथील रहिवासी असून, ते शेतमजूर असल्याची माहिती आहे. गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास मालदाभाडी फाट्या जवळील पेट्रोल पंपानजीक हा अपघात घडला. पल्सर दुचाकी बोदवडकडून येत असताना जामनेरकडून जाणाऱ्या ट्रकची (क्र. एचआर ५५ एके ५२३२) तिला धडक बसली. या दुर्घटनेत दुचाकीवरील सहाही जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये रामा सुरशिंग भिलाले (२६), शिमला रामा भिलाले (२२), पुज्या रामा भिलाले (५), भरती रामा भिलाले (३), श्रवण रामा भिलाले (तीन महिने) आणि चंपालाल रेवणशिंग भिलाले (२८) यांचा समावेश आहे. अपघातस्थळाजवळील एचपी पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी मिळवले आहे.

जरुडच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने

# 'नशा मुक्त भारत' निबंध स्पर्धा व जनजागृती रॅली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने केंद्र व राज्य सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नशामुक्त भारत जनजागृती रॅलीचे व निबंध स्पर्धेचे




आयोजन करण्यात आले.

आजची तरुण पिढी देशाचे उज्वल भविष्य आहे. ही तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या आहारी जाऊ नये व व्यसनाधीनतेच्या आहारी गेलेल्या तरुणांना व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी जनजागृती घडविण्याच्या उद्देशाने निबंध स्पर्धा व रॅलीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.जी.आर.तडस, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शशिकांत काळे, डॉ.राम कुलसंगे, डॉ.विनायक भटकर, डॉ.रविकांत महिंदकर, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, डॉ.पूजा महाले, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, अर्चना राऊत, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.लीलाधर चौधरी, संतोष चव्हाण, निलेश बंदे, अनिल हरले, दुर्गा हरले, रासेयो स्वयंसेवक पियुष पाटील, ईशांत गाडगे, आकाश झाडे, यश मगर्दे, अनस पठाण, आर्यन अग्रवाल, किरण खंते, कृणाल चव्हाण, पियुष बडोदेकर, यशवंत कुसराम, रागिणी बारमासे, अंकिता नागदेवते, देवश्री शेंडे, गुलताज शहा, पायल वट्टी, रंजना कुमरे, साक्षी उईके, वेदिका उमक, आरती नेहारे इत्यादी उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुलात

# नवरात्र उत्सवानिमित्त कन्या पूजन



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – कलाजीवन बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल, ढगा येथे नवरात्र उत्सवानिमित्त भक्तिभावात कन्या पूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात पार्वती माता देवस्थान एकदरा येथे करण्यात आली. येथे सकाळी सर्व भाविक भक्तांना उपवासाचे फराळी पदार्थ वाटप करण्यात आले. त्यानंतर गुरुकुल परिसरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुकुलातील सर्व विद्यार्थिनींना पारंपारिक वेशभूषेत तयार करून कार्यक्रमस्थळी बोलाविण्यात आले. सर्व मुलींना चौपाटावर (चौरंगावर) मानाने बसविण्यात आले. भारतीय संस्कृतीप्रमाणे सर्व कन्यांचे पाय धुऊन त्यांना हळद-कुंकू लावण्यात आले.

त्यानंतर सर्व कन्यांना प्रसाद म्हणुन केळी आणि भेटवस्तु म्हणुन रुमाल देण्यात आले.

स्व.जयश्री अरविंद श्रीराव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ

# वाचनालयातील विद्यार्थ्यांसाठी २१ हजार रुपयांची पुस्तके

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्व.जयश्री अरविंद श्रीराव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सद्यः नागपुर येथे राहात असलेले अरविंद श्रीराव यांनी पुसला येथील स्वयंअध्ययन केंद्र वाचनालयातील विद्यार्थ्यांसाठी २१ हजार रुपयांची पुस्तके भेट दिली. त्यांच्या या उपक्रमामुळे वाचनालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी तसेच ज्ञानवृद्धीसाठी मोलाची मदत होणार आहे.






विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना अभ्यासासाठी आवश्यक पुस्तके उपलब्ध व्हावीत आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य साहित्य मिळावे, या उद्देशाने ही पुस्तकभेट देण्यात आली. या उपक्रमातून स्व.जयश्री यांच्या स्मृती जपण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

यावेळी आशिष उर्फ गुड्डू श्रीराव, किरण चिमोटे, संदीप बागडे, गजानन नानोटकर, माजी सरपंच सुशीला श्रीराव, ॲड.राहुल श्रीराव आणि रवी वाहने यांच्यासह स्वयंअध्ययन केंद्र वाचनालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली ही पुस्तकभेट प्रेरणादायी असून सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. या मदतीबद्दल स्वयंअध्ययन केंद्र वाचनालयाच्या वतीने अरविंद श्रीराव यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# संपादकीय

**शब्द जपून वापरा, कारण ते एकदा बोलले की परत घेता येत नाहीत.**

## डिजिटल साम्राज्याची लढाई : भारताचा 'खरा बॉस'

मुकेश अंबानी आणि एलन मस्क यांच्या व्यावसायिक हितसंबंधांमधून केवळ दोन उद्योगपतींची स्पर्धा दिसत नाही, तर दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह इंटरनेट, डिजिटल अर्थव्यवस्था आणि जागतिक सत्तासंतुलन यांच्यातील संघर्षाचे व्यापक चित्र समोर येते. या स्पर्धेत भारताचे सार्वभौमत्व, ग्राहकांचे हित आणि तंत्रज्ञानावरील नियंत्रण यांची कसोटी लागणार आहे.

अग्रलेख : डिजिटल महासत्तेच्या उंबरठ्यावर भारत

एकविसाव्या शतकात जगावर सत्ता गाजविण्याचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी ज्याच्या हाती जमीन, नैसर्गिक साधनसंपत्ती, लष्करी सामर्थ्य आणि आर्थिक बाजारपेठा होत्या, त्याच्याकडे जागतिक सत्तेची सूत्रे असत. आज या पारंपरिक शक्तींबरोबरच इंटरनेट, डेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह संपर्क आणि डिजिटल पायाभूत सुविधांवर नियंत्रण असणेही तितकेच महत्त्वाचे ठरले आहे. जगातील बलाढ्य उद्योगपतींची स्पर्धा त्यामुळे आता केवळ नफ्यापुरती मर्यादित राहिलेली नाही; ती भविष्यातील अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेवर प्रभाव टाकण्याची लढाई बनली आहे. मुकेश अंबानी यांना भारताचे 'खरे बॉस' संबोधण्याच्या संदर्भातून या नव्या वास्तवाची चर्चा पुढे येते. मात्र, अशा विधानामागील नेमका संदर्भ आणि त्याची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. कोणत्याही एका उद्योगपतीला देशाचा खरा मालक किंवा बॉस मानणे हे लोकशाहीच्या मूल्यांशी सुसंगत नाही. भारताची खरी ताकद त्याची जनता, संविधान, लोकशाही संस्था आणि उद्यमशीलता यात आहे. तरीही अंबानी आणि एलन मस्क यांच्यासारख्या जागतिक प्रभावशाली उद्योगपतींच्या व्यावसायिक स्पर्धेकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अंबानी विरुद्ध मस्क : संघर्ष इंटरनेटचा, प्रभाव सत्तेवर! रिलायन्स इंडस्ट्रीजचे प्रमुख मुकेश अंबानी आणि टेस्ला, स्पेसएक्स तसेच स्टारलिंकशी संबंधित एलन मस्क यांच्यातील संघर्षाला ऑक्टोबर २०२६ मध्ये नवे वळण मिळाले आहे. भारतात स्टारलिंकच्या उपग्रह इंटरनेट सेवेला प्रत्यक्ष व्यावसायिक सुरुवात करण्यासाठी आवश्यक मंजुऱ्या आणि सुरक्षा तपासण्यांचा मुद्दा वादाच्या केंद्रस्थानी आहे. मस्क यांनी सोशल मीडियावर अंबानी यांना उपरोधिकपणे 'भारताचे खरे बॉस' संबोधत भारतीय बाजारपेठेतील स्पर्धेबाबत प्रश्न उपस्थित केले. मस्क यांच्या या वक्तव्याकडे केवळ एका उद्योगपतीने दुसऱ्या उद्योगपतीवर केलेली टीका म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. भारतासारख्या विशाल बाजारपेठेत प्रवेश मिळविण्यासाठी जागतिक तंत्रज्ञान कंपन्या किती उत्सुक आहेत, याचे ते द्योतक आहे.




# सत्तेचा अहंकार लोकशाहीला घातक!

लोकशाही ही केवळ निवडणुका जिंकून सत्ता स्थापन करण्याची व्यवस्था नाही, तर जनतेच्या अपेक्षांचा आदर करण्याची, विरोधी विचारांना सामावून घेण्याची आणि सत्तेवर नियंत्रण ठेवण्याची एक व्यापक जीवनपद्धती आहे. लोकशाहीत बहुमताला सरकार चालविण्याचा अधिकार मिळतो; मात्र त्या अधिकारासोबत जनतेप्रती उत्तरदायित्वाची जबाबदारीही येते. दुर्दैवाने, जेव्हा सत्तेचे सामर्थ्य जनसेवेऐवजी अहंकाराचे साधन बनते, तेव्हा लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांनाच धोका निर्माण होतो. केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कारभाराचे मूल्यमापन करताना या प्रश्नांचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

निवडणुकीत मिळालेले बहुमत म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकाने सरकारच्या प्रत्येक निर्णयाला दिलेली संमती नव्हे. मतदार सरकारला काम करण्याची संधी देतात; त्याच वेळी चुका दाखविण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि धोरणांवर टीका करण्याचा अधिकारही स्वतःकडे राखून ठेवतात. म्हणूनच लोकशाहीत सरकारची लोकप्रियता जितकी महत्त्वाची आहे, तितकीच त्याची टीका सहन करण्याची क्षमता महत्त्वाची असते. सत्तेची खरी ताकद विरोधकांना गप्प करण्यात नसते, तर विरोधकांचे प्रश्न ऐकून त्यांना योग्य उत्तरे देण्यात असते.

**विरोधकांचा आवाज दाबून प्रश्न संपत नाहीत!**

संसद हे लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. येथे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात मतभेद असणे स्वाभाविक आहे. देशातील महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, आर्थिक विषमता, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक न्याय अशा विषयांवर सरकारला प्रश्न विचारणे हे विरोधकांचे कर्तव्य आहे. या प्रश्नांना उत्तरे देणे ही सरकारची जबाबदारी आहे.

विरोधकांनी केलेली प्रत्येक टीका योग्य असेलच असे नाही. राजकीय फायद्यासाठी काही वेळा आरोप-प्रत्यारोपही होतात. मात्र, त्यावर उत्तर देण्यासाठी तथ्ये मांडणे, चर्चेला सामोरे जाणे आणि चुकीच्या आरोपांचे खंडन करणे, हाच लोकशाहीचा मार्ग आहे. विरोधकांचा आवाज दाबणे, चर्चेची संधी मर्यादित करणे किंवा प्रश्न विचारणाऱ्यांकडे राजकीय शत्रू म्हणून पाहणे, यामुळे सरकारची प्रतिमा अधिक मजबूत होत नाही; उलट सरकारच्या पारदर्शकतेविषयी शंका निर्माण होऊ शकते.

विरोधी पक्ष हे लोकशाहीचे शत्रू नसतात. ते सत्तेवर नियंत्रण ठेवणारी आणि पर्यायी धोरणे मांडणारी महत्त्वाची व्यवस्था असतात. सशक्त विरोधक म्हणजे सशक्त लोकशाही. त्यामुळे विरोधकांचे अस्तित्व आणि त्यांचा अभिव्यक्तीचा अधिकार हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे.



**बहुमत म्हणजे मनमानीचा परवाना नव्हे!**

निवडणुकीतील विजयामुळे सरकारला धोरणे राबविण्याचा अधिकार मिळतो; पण तो अधिकार अमर्याद नसतो. भारतीय संविधानाने प्रत्येक सत्तेला मर्यादा घातल्या आहेत. कायद्याचे राज्य, स्वतंत्र न्यायव्यवस्था, संसदीय उत्तरदायित्व आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत.

कोणत्याही सरकारने या मर्यादांचा आदर केला पाहिजे. एखादे धोरण देशहिताचे असल्याचा सरकारचा दावा असला, तरी त्याची उपयुक्तता, परिणाम आणि अंमलबजावणी यांवर चर्चा होणे आवश्यक आहे. धोरणाला विरोध झाला म्हणजे तो देशविरोध नव्हे. अनेकदा विरोधातूनच त्रुटी समोर येतात आणि निर्णय अधिक लोकाभिमुख होतात.

मोठे निर्णय घेताना जनतेचा विश्वास संपादन करणे, संबंधित घटकांशी संवाद साधणे आणि निर्णयांचे परिणाम स्पष्ट करणे गरजेचे असते. सरकारकडे संख्याबळ असले तरी जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याचा नैतिक अधिकार त्याला मिळत नाही. कारण सत्ता ही जनतेने दिलेली जबाबदारी आहे, कायमस्वरूपी मालकी नव्हे.

**महागाई आणि बेरोजगारीचे प्रश्न महत्त्वाचेच!**

देशात राजकीय चर्चांना अनेकदा प्राधान्य मिळते; मात्र सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील प्रश्नांकडे अपेक्षित लक्ष दिले जाते का, हा विचार करण्याचा विषय आहे. वाढता घरखर्च, रोजगाराच्या संधी, तरुणांचे भविष्य, शेतमालाला योग्य भाव, छोट्या व्यापाऱ्यांच्या अडचणी आणि सर्वसामान्यांच्या आरोग्यविषयक गरजा या प्रश्नांवर ठोस उपाययोजना होणे आवश्यक आहे.

सरकार कोणत्याही पक्षाचे असो, नागरिकांना त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल अपेक्षित असतो. विकासाच्या मोठमोठ्या घोषणा आणि आकडेवारी यांना तेव्हाच अर्थ प्राप्त होतो, जेव्हा त्याचा लाभ सामान्य माणसापर्यंत पोहोचतो. रस्ते, उद्योग, डिजिटल सुविधा आणि पायाभूत विकास महत्त्वाचे आहेत; परंतु त्याचबरोबर दर्जेदार शिक्षण, परवडणारी आरोग्यसेवा आणि सन्मानजनक रोजगारही तितकेच महत्त्वाचे आहेत.

सरकारने विकासकामांची माहिती देताना यशाबरोबरच अपयशांचाही प्रामाणिक आढावा घेतला पाहिजे. एखादी योजना अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाली नाही, तर तिच्यात सुधारणा करण्याची तयारी असली पाहिजे. चुका मान्य करणे हे दुर्बलतेचे नव्हे, तर जबाबदार नेतृत्वाचे लक्षण आहे.

**प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही!**

लोकशाहीमध्ये अभिव्यक्तिस्वातंत्र्याला विशेष महत्त्व आहे. पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, शेतकरी संघटना आणि सामान्य नागरिक यांनी सार्वजनिक धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे ही निरोगी लोकशाहीची खूण आहे. टीका सभ्य, तथ्याधारित आणि कायद्याच्या चौकटीत असावी, ही अपेक्षा रास्त आहे. परंतु सरकारवर टीका केली म्हणून एखाद्याला देशविरोधी ठरविणे किंवा त्याच्या प्रत्येक प्रश्नामागे राजकीय कट असल्याचे गृहीत धरणे योग्य नाही.

माध्यमांची भूमिका तर याबाबतीत अधिक महत्त्वाची आहे. सत्ताधाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे, सरकारी दाव्यांची पडताळणी करणे आणि दुर्लक्षित घटकांचे प्रश्न समाजासमोर आणणे, हे पत्रकारितेचे मूलभूत कर्तव्य आहे. माध्यमांनीही कोणत्याही पक्षाच्या प्रचाराचे साधन न बनता निष्पक्षता, सत्यता आणि जनहित यांना प्राधान्य दिले पाहिजे.

स्वतंत्र माध्यमे आणि निर्भय नागरिक हे लोकशाहीचे रक्षणकर्ते आहेत. त्यांच्यावर टीका होऊ शकते; त्यांच्या चुका दाखवून देता येतात. मात्र, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्यच कमकुवत झाले, तर सत्तेच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा दुर्बल होण्याचा धोका निर्माण होतो.

**सत्ताधाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे!**

लोकशाहीत सरकार बदलते, पक्ष बदलतात आणि नेतृत्वही बदलते; परंतु संविधान आणि लोकशाहीची मूल्ये कायम राहिली पाहिजेत. आज केंद्रात एक पक्ष सत्तेत आहे, उद्या दुसरा पक्ष सत्तेत येऊ शकतो. त्यामुळे सत्तेचा वापर करताना प्रत्येक सरकारने आपण घालून देत असलेले राजकीय संकेत भविष्यात स्वतःवरही लागू होऊ शकतात, याचे भान ठेवले पाहिजे.

सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना शत्रू मानण्याऐवजी त्यांच्यातील योग्य सूचनांचा स्वीकार करावा. संसदेतील चर्चा अधिक अर्थपूर्ण करावी. जनतेच्या प्रश्नांना स्पष्ट उत्तरे द्यावीत. सरकारी निर्णयांमध्ये पारदर्शकता राखावी आणि प्रशासनाला जनतेप्रती उत्तरदायी बनवावे. ही अपेक्षा कोणत्याही एका पक्षापुरती मर्यादित नाही; ती प्रत्येक लोकशाही सरकारकडून असली पाहिजे.

राजकारणात विजय आणि पराभव हे अपरिहार्य असतात. परंतु लोकशाहीचे नुकसान झाले, तर त्याची किंमत संपूर्ण देशाला मोजावी लागते. म्हणूनच सत्ताधाऱ्यांनी बहुमताचा गर्व करण्याऐवजी जनतेने दिलेल्या विश्वासाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

**जनतेचा आवाज सर्वोच्च!**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार असो किंवा देशातील कोणतेही राज्य सरकार, प्रत्येक सत्ताधाऱ्याने एक मूलभूत सत्य लक्षात ठेवले पाहिजे लोकशाहीत सत्ता ही अंतिम ध्येय नसून जनसेवेचे साधन आहे. सरकारच्या निर्णयांना समर्थन देणाऱ्यांइतकाच विरोध करणाऱ्यांचाही देशावर अधिकार आहे. कारण नागरिकत्व, संविधानाने दिलेले अधिकार आणि लोकशाहीतील समान स्थान हे राजकीय पसंतीवर अवलंबून नसते.

बहुमत मिळविणे ही राजकीय कामगिरी असू शकते; परंतु जनतेचा विश्वास टिकविणे ही नेतृत्वाची खरी कसोटी असते. विरोधकांचे प्रश्न ऐकणे, टीकेला उत्तर देणे, चुका सुधारणे आणि सामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविणे यातूनच सरकारची विश्वासार्हता वाढते. सत्तेचा अहंकार क्षणिक असतो; लोकशाहीची मूल्ये चिरंतन असतात. विरोधकांचा आवाज दाबून जनतेचे प्रश्न संपत नाहीत आणि बहुमताच्या जोरावर जनतेच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष करता येत नाही.

शेवटी, सरकार कोणाचेही असो, देश कोणत्याही एका पक्षाचा नसतो. तो कोट्यवधी नागरिकांचा असतो. त्यामुळे सत्तेच्या प्रत्येक निर्णयावर जनतेला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि त्या प्रश्नांना उत्तर देण्याची जबाबदारी सरकारची आहे. लोकशाहीत जनतेचा आवाज दडपण्याचा नव्हे, तर तो ऐकण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. हाच संविधानाचा सन्मान आणि लोकशाहीचा खरा विजय आहे.

# दुष्काळग्रस्त महाराष्ट्र अन मुंबईचे पाणी नियोजन

आज महाराष्ट्राच्या नकाशावर दोन परस्परविरोधी चित्रे उभी आहेत. मराठवाड्यात पाण्यासाठी माणसे आणि जनावरे तडफडू लागली आहेत, तर मुंबईच्या तलावांमध्ये सात धरणांचा साठा ९५.८४ टक्के आहे. मुंबईत 'पाणीबाणी' आज नाही, हे प्रामाणिकपणे मान्य करायलाच हवे. पण राज्याचा एक भाग कोरडा पडत असताना दुसरा भाग काठोकाठ भरलेला असेल, तर प्रश्न निसर्गाचा राहत नाही. तो न्यायाचा आणि नियोजनाचा बनतो.



आधी दुष्काळाचे चित्र पाहू. राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ च्या शासन निर्णयाने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. १ जून ते २५ सप्टेंबर या काळात राज्याचा एकूण पावसाचा तुटवडा जवळपास १८ टक्के आहे आणि ३६ पैकी २० जिल्ह्यांत पाऊस कमी पडला. सरासरीचा आकडा फसवा असतो. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत सामान्य पावसाच्या निम्म्याच्या आसपास पाणी पडले आहे. यंदाच्या तुटवड्याला एल-निनोचा संदर्भ दिला जात आहे. पण तुटवड्याइतकाच खंडित पाऊस, म्हणजे दोन पावसांमधील दीर्घ खंड पिकांना मारक ठरला आहे. त्यामुळे कापूस, सोयाबीन, मूग आणि उडीद या खरीप पिकांवर गंभीर संकट आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २२ आणि २३ सप्टेंबरला लातूरसह दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केला आणि केंद्राकडे शेतकऱ्यांसाठी मदत मागितली. दौरा आणि मागणी योग्यच आहे. पण ती दुष्काळाचे पाऊल उशिरा पडल्याचीही कबुली आहे. पाण्याच्या साठ्याचे चित्र अधिक भयावह आहे. राज्यातील धरणांचा एकत्रित साठा कागदावर समाधानकारक म्हणजे सुमारे ७६ टक्के दिसतो. पण हा आकडा प्रत्येक जिल्ह्यातील पाण्याची सुरक्षितता दाखवत नाही. तो कोकण आणि घाटमाथ्यावरील जोरदार पावसाच्या धरणांमुळे फुगलेला आहे. सर्वाधिक धरणे असलेल्या मराठवाड्यात, म्हणजे ९२९ प्रकल्पांमध्ये, २० सप्टेंबरच्या आकडेवारीनुसार साठा फक्त ४६ टक्के आहे, तर गेल्या वर्षी तो ८१ टक्के होता. म्हणजे एका वर्षात जवळपास निम्म्याने घट झाली आहे. हे सरासरीच्या मागे लपलेले वास्तव आहे. जिथे साठा सर्वात कमी आहे तिथेच लोकसंख्येचा आणि शेतीचा ताण सर्वात जास्त आहे.

मुंबईला पाणी नियोजनाची गरज मुंबईला पाणी पुरवणारे तलाव ठाणे, पालघर आणि नाशिक जिल्ह्यांत आहेत. म्हणजे ज्या भागात पाऊस चांगला पडला, तिथले पाणी महानगराला मिळाले. पण मुंबईची स्वतःची तूट कायम आहे. पुरवठा आणि मागणी यांतील दरी, गळती आणि अनधिकृत जोडण्या ही स्थिती यंदाही बदललेली नाही. १ ऑक्टोबरचा साठा ९६.३१ टक्के आहे, तर गेल्या वर्षी तो ९८.७ आणि २०२४ मध्ये ९९.३७ टक्के होता. म्हणजे साठा हळूहळू घसरतो आहे. यात आणखी एक धोका आहे. जेव्हा राज्याच्या एका भागात दुष्काळ असतो, तेव्हा पाण्यासाठी राजकीय खेचाखेच सुरू होते.उद्या अशी योजना पुन्हा पुढे आली, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी साहजिकच विचारेल की आमच्या वाट्याचे पाणी शहरातील जलतरण तलाव आणि टॉवरसाठी का?

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# शाळा प्रवेशासाठी बालकांचे वयाचे नवे निकष जाहीर, नर्सरी आणि पहिलीसाठी 'इतकी' वर्षे पूर्ण असणं बंधनकारक

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – महाराष्ट्रातील शाळांमधील पूर्व-प्राथमिक ते इयत्ता पहिलीच्या प्रवेशाबाबत राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने अत्यंत महत्त्वपूर्ण शासन निर्णय जारी केला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदींनुसार



शाळा प्रवेशासाठी बालकांचे किमान वय टप्प्याटप्प्याने लागू करण्याचा मोठा निर्णय शासनाने घेतला आहे.

या नव्या नियमांनुसार प्रवेशासाठी बालकाचे निश्चित करण्यात आलेले वय ३० जून रोजी पूर्ण असणे आवश्यक राहणार असून, हे नवे निकष शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून टप्प्याटप्प्याने लागू केले जातील.

कोणत्या वर्षापासून वयाचा कोणता नियम? राज्य शासनाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार पूर्व-प्राथमिक ते इयत्ता पहिलीच्या प्रवेशाचे वयाचे निकष पुढीलप्रमाणे टप्प्याटप्प्याने लागू केले जातील, बालवाटिका-१ म्हणजेच नर्सरीच्या प्रवेशासाठी बालकाचे वय ३ वर्षे पूर्ण असणे शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून अनिवार्य असेल. बालवाटिका-२ म्हणजेच ज्युनिअर के.जी.साठी ४ वर्षे पूर्ण असण्याचा निकष २०२८-२९ पासून लागू होईल. बालवाटिका-३ म्हणजेच सिनिअर के.जी.साठी ५ वर्षे पूर्ण असण्याचा निकष २०२९-३० पासून लागू होईल. इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी बालकाचे वय ६ वर्षे पूर्ण असण्याचा कडक नियम शैक्षणिक वर्ष २०३०-३१ पासून लागू केला जाईल.

'या' विद्यार्थ्यांना मिळणार नव्या नियमातून पूर्ण सूट पालक आणि विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी राज्य सरकारने काही महत्त्वाच्या सवलती जाहीर केल्या आहेत, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील नर्सरी ते इयत्ता पहिलीत शिकणाऱ्या विद्यमान विद्यार्थ्यांना हे नवीन वयाचे निकष लागू होणार नाहीत.

कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेतून मागील वर्ग यशस्वीपणे उत्तीर्ण झालेल्या नियमित विद्यार्थ्यांना पुढील उच्च वर्गात प्रवेश देताना वयाचे नवे निकष लागू होणार नाहीत, त्यांना यातून सूट देण्यात आली आहे.

### स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू मीडल स्कूल येथे

# एस.के.वंजारी स्मृती आंतरशालेय औषधी वनस्पती प्रदर्शनी

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन शेंदूरजनाघाट द्वारा संचालित स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू मीडल स्कूल येथे एच.के.एम.उर्दू हायस्कूल वरुड व स्व. पंजाबराव ठाकरे उर्दू मीडलस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने एस.के.वंजारी स्मृती आंतरशालेय औषधी वनस्पती प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रदर्शनीमध्ये विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मॉडेलचे सादरीकरण विलक्षण होते. उदघाटन असोसिएशनचे अध्यक्ष अब्दुल शकील यांच्यासह रंजना वंजारी व मौलवी मतीन यांच्यासोबत नईम शेख जरुडकर, सय्यद सादिक, एहराज फैसल, शेख मुनझीम यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. प्रदर्शनीचे औषधी वनस्पती तसेच विज्ञान व तंत्रज्ञान या दोन भागात विभाजन करण्यात आले होते. त्यामध्ये अ, ब, क, ड, इ,फ, ग व ह गटात विभाजन करण्यात आले असून त्यामध्ये तसेच २६० विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनी मध्ये सहभाग नोंदवला होता. परीक्षण व निरीक्षण अनुक्रमे माजी प्रा.व्हि.आर.देशमुख, डॉ.प्रदीप भगत, सेवानिवृत्त मुख्याध्यापक जगदीश वानखडे, मो.युनूस शेख, डॉ.लोकेश बरधे, डॉ.सुनील मेहरे, डॉ.अल्तमश फैसल व डॉ.मयंक टोटला, डॉ.प्रज्वल पाचगडे, डॉ.शिवाजी क्षीरसागर, डॉ.कुदसीया फिरदोस, डॉ.प्रियंका नेरेकर, डॉ.कल्याणी शुभम पावडे व आलिया कौसर यांनी केले.

या प्रदर्शनातील सहभागी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला विविध पुरस्कार देण्यात आले. यावेळी पीपल चॉईस अवार्ड मध्ये शिफा सलमान खान, मदिहां शेख सलीम, सुमायरा समीउल्ला पठाण, इफ्रा मो.निसार, माहीन शेख वहीद, सायमा अ.सलीम, आरिषशाह अफसरशाह, मो.जियान शेख अमर, अझलीफा हुसेनशाह, हसनैन अहमद, सना मो.फारुक, आजरा जमील अहमद यांनी मानांकन मिळविले. याप्रसंगी व्ही.आर.देशमुख, डॉ.प्रदीप भगत, युनुस शेख,जगदीश वानखडे यांचा संस्थाध्यक्ष अब्दुल शकील यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रास्तविक नईम शेख जरूडकर, संचालन नईम अहमद व एहराज फैसल यांनी केले आणि आभार सय्यद सादिक यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दोन्ही शाळेच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे श्रम लाभले.

### श्रीमती राईबाई डोमाजी सोनारे विद्यालयात

# शिक्षक-विद्यार्थी-पालक सभेचे आयोजन



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या वघाळ येथील श्रीमती राईबाई डोमाजी सोनारे विद्यालयात नुकतेच शिक्षक-विद्यार्थी-पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते.




सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अजय बरडे होते तर प्रमुख अतिथी म्हणुन नितीन गायकवाड, राजु बडखाने, मनोज बहुरुपी, रोशन गायकवाड उपस्थित होते. या पालक सभेला माता पालक हर्षा गायकवाड, मंदा गिरी, अंकिता बडखाने, बबीता बहुरूपी, प्रीतम हरले यांनी सुद्धा उपस्थित दर्शवली होती. या सभेमध्ये शाळेमधील विद्यार्थ्यांना मासिक पाळी व्यवस्थापन अनुषंगाने शाळेतील शिक्षिका एम.एम.धुर्वे यांनी मार्गदर्शन केले तसेच या सभेच्या अनुषंगाने विद्यार्थी गैरहजेरी तसेच सत्रामध्ये लवकरच सुरु होणाऱ्या प्रथम सत्र परीक्षेच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सूचना करण्यात आल्या. शिक्षक आणि पालकांची भूमिका, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे आरोग्य इत्यादी बाबींवर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. या सभेचे संचालन शिक्षिका प्रतीक्षा बासंदे, प्रास्ताविक व आभार सहाय्यक शिक्षक पी.एम.सोनुले यांनी केले. या सभेला सर्व कर्मचारी, पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मोर्शी तालुक्यात गॅस वितरणाचा मनमानी कारभार

### घरपोच सेवेसाठी पैसे घेऊनही ग्राहकांना चौकात बोलावले जाते

### दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय, ठिय्या आंदोलनाचा इशारा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – मोर्शी तालुक्यात गॅस वितरण करणाऱ्या कटारिया गॅस एजन्सीच्या कारभाराबाबत ग्राहकांकडून नाराजी व्यक्त केली जात असून, गॅस वितरणातील कथित मनमानी आणि ग्राहक सुविधांकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही पुरवठा विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.






गॅस सिलेंडरची घरपोच सेवा देण्याची तरतूद असतानाही गावात वितरणासाठी येणारे वाहन रस्त्याच्या कडेला किंवा चौकात उभे करून ग्राहकांना सिलेंडर घेण्यासाठी वाहनाजवळ बोलावले जात असल्याची तक्रार आहे. घरपोच वितरणाचे शुल्क आकारले जात असताना प्रत्यक्षात ग्राहकांना ही सुविधा मिळत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांना गर्दीतून सिलेंडर घेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

याशिवाय, गॅस सिलेंडरची गळती तपासण्यासाठी आवश्यक साहित्य वितरण कर्मचाऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ग्राहकांना सिलेंडरची पावती देणे आवश्यक असताना पावत्या दिल्या जात नसल्याची तक्रार आहे. एजन्सीच्या कार्यालयात ग्राहकांना बसण्यासाठी तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याचेही सांगण्यात येत आहे. कार्यालयातील दूरध्वनी क्रमांकही अनेकदा बंद असल्याने ग्राहकांना संपर्क साधताना अडचणी येत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

या सर्व प्रकाराबाबत नागरिकांनी पुरवठा विभागाकडे अनेकदा तक्रारी केल्या; मात्र अद्याप ठोस पावले उचलण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित गॅस एजन्सीच्या कारभाराची चौकशी करून ग्राहकांना नियमानुसार सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तालुक्यातील दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भातील लेखी निवेदन अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडे पाठविण्यात आल्याचे समजते. आता या तक्रारींची दखल घेऊन संबंधित विभाग काय कारवाई करतो, याकडे ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

# दिवाळीत एसटी प्रवाशांना दिलासा : १५ टक्के हंगामी भाडेवाढ रद्द

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यावर ओढवलेले दुष्काळाचे संकट आणि वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीची दिवाळी कालावधीतील प्रस्तावित १५ टक्के हंगामी भाडेवाढ नामंजूर केली आहे. या निर्णयामुळे



दरवर्षी दिवाळीच्या दिवसांत होणारी एसटीची हंगामी भाडेवाढ यंदा टळल्याने सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. दरवर्षी दिवाळीत गर्दीच्या काळात एसटी प्रवासी भाड्यात हंगामी वाढ केली जाते. यंदाही १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनाने 'एसटी' महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्याकडे सादर केला होता. मात्र, आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर आणखी भार टाकणे योग्य नसल्याची भूमिका घेत त्यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. आधीच संकटांनी घेरलेल्या जनतेला भाडेवाढीचा चटका देऊन त्यांच्या जखमेवर मीठ चोळणे मला मान्य नाही, असे स्पष्ट करीत त्यांनी जनहिताला प्राधान्य दिले.

# हिवरखेड येथे शिवसेना महिला आघाडीची पदाधिकारी आढावा बैठक संपन्न

### असंख्य महिलांचा शिवसेनेत प्रवेश

### शाखा विस्तार आणि मोफत महिला आरोग्य शिबिराच्या नियोजनावर चर्चा

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – मोर्शी विधानसभा मतदारसंघातील हिवरखेड येथे शिवसेना महिला आघाडी, अमरावती जिल्ह्याच्या वतीने पदाधिकारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत मोर्शी तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात महिला शाखांचे संघटन मजबूत करणे, शाखा विस्तार करणे तसेच आगामी काळात आयोजित करण्यात येणाऱ्या मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मोर्शी तालुक्यातील असंख्य



महिलांनी शिवसेना महिला आघाडीत जाहीर प्रवेश केला.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख जयश्री कातकिडे होत्या, तर महिला आघाडीच्या मोर्शी तालुकाप्रमुख योगिता मस्के यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी उपजिल्हाप्रमुख लीना गाडबैल, विधानसभा प्रमुख हर्षा गोरडे, तालुका समन्वयक दीपिका नागपुरे, सर्कल प्रमुख संगीता काठोडे आणि उपतालुका प्रमुख प्रगती वानखडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीला शाखाप्रमुख रेखा भोजने, लता नागपुरे, लता ढोरे, उषा ढोरे, ज्योती शेंडे, माजी सरपंच सुरेखा ढेवले, नरेंद्र ढोरे, सुधीर भोजने, संजय वासनकर, अनुराग नेरकर यांच्यासह वंदना निमकर, ज्योती ढोले, मयुरी धुप, अनुराधा ढोरे, रंजना धोटे, प्रभा कवटकर, मंगला ठाकरे, हर्षा ठाकरे, रत्नमाला मोकलकर, मंगला पंचधुरे, शोभा माकोडे, जयश्री वेटे, शुभांगी शिरभाते, प्रमिला डाकरे, शिला मढके, संगीता मैत्रे, अर्चना म्हस, दुर्गा बोरवाले, सुनिता, दीपाली वाट, गिरजा नेहारे, प्रतिक्षा भुंते, नुतन काळे, अर्चना खोडसकर, बापू तडम, भाग्यश्री घाटोळे यांच्यासह अन्य महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाप्रमुख जयश्री कातकिडे यांनी सांगितले की, महिला हा शिवसेनेचा कणा असून प्रत्येक गावात महिला शाखा मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.

शासनाच्या विविध योजना तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी महिला आघाडीच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील. तसेच लवकरच मोर्शी तालुक्यात भव्य मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

या बैठकीमुळे मोर्शी तालुक्यातील महिला संघटन विस्ताराला चालना मिळणार असून आगामी काळात महिला आरोग्य आणि जनजागृतीच्या उपक्रमांवर भर दिला जाणार असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

### जरुडच्या कला वाणिज्य महाविद्यालयामध्ये

# डॉ.कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जरुड येथील कला वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जी.आर.तडस होते तर प्रमुख मार्गदर्शक डॉ.विष्णु पडवाल, प्रमुख अतिथी डॉ.रविकांत महिंदकर व डॉ.शशिकांत काळे हे उपस्थित होते. सर्वप्रथम प्रतिमेचे पुजन करण्यात आले. डॉ.विष्णु पडवाल यांनी सर्व प्रथम विद्यार्थ्यांनी डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे जीवन समजून घ्यावे. जीवनात यशस्वी होण्यासाठी आधी ध्येय ठरवून नंतर कसोसीने प्रयत्न करावे, असे सांगितले. डॉ.रविकांत महिंदकर व डॉ.शशिकांत काळे यांनीही आपले विचार मांडले. प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जीवन म्हणजे संघर्षमयी प्रवास होय. प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन ते भारताच्या राष्ट्रपती पदावर आरूढ झाले, असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ.प्रज्ञा निंभोरकर तर आभार अजय ढोमणे याने मानले.

याप्रसंगी महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी अर्चना राऊत, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, डॉ.पुजा महाले, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, संतोष चव्हाण, अजय ढोमणे, पियुष बडोदेकर, कांचन शिंदे, सारीका मरस्कोल्हे, यामिनी काळमेघ, पवन धुर्वे, किरण खंते, यशवंत कुसराम इत्यादी उपस्थित होते.

# शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा

### विद्यार्थ्यांच्या रॅलीतून स्वच्छतेचा संदेश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मोर्शी** – येथील शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना हातांच्या स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले, तसेच जनजागृती रॅली काढून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

जागतिक हात धुवा दिनानिमित्त विद्यालयातील शिक्षिका आश्लेषा जाधव यांनी विद्यार्थ्यांना हात धुण्याचे महत्त्व समजावून सांगितले. जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर तसेच आवश्यकतेनुसार साबणाने हात धुणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. हात स्वच्छ धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिकही यावेळी दाखविण्यात आले. हातांची स्वच्छता राखल्याने अनेक संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळते, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.

या उपक्रमांतर्गत शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी रॅली काढून स्वच्छतेचा संदेश दिला. स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन या माध्यमातून करण्यात आले.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अजय धोटे व उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर यांनी या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

# मस्क यांच्या सनसनाटी आरोपांवर पहिल्यांदाच रिलायन्सकडून पहिल्यांदाच निवेदन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – भारतात स्टारलिंक या सॅटेलाइट इंटरनेट सेवेच्या प्रवेशावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, रिलायन्स इंडस्ट्रीजने म्हटले आहे की, त्यांना स्पर्धेची भीती वाटत नाही. कंपनीने 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले आहे की, खरी स्पर्धा ती आहे जी ठरवते की सर्वोत्तम सेवा कोण देते.

अब्जाधीश एलॉन मस्क यांनी केलेल्या आरोपांनंतर कंपनीने हे निवेदन जारी केले आहे, ज्यात त्यांनी दावा केला होता की भारतीय दूरसंचार कंपन्या स्टारलिंकच्या मार्गात अडथळा आणत आहेत. एलॉन मस्क गेल्या काही दिवसांपासून भारतात स्टारलिंकच्या प्रक्षेपणाला होणाऱ्या विलंबाबद्दल नाराजी व्यक्त करत आहेत. या विलंबासाठी ते रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांना जबाबदार धरलं आहे आणि सोशल मीडियावर त्यांच्या विरोधात पोस्ट करत आहेत.

अलीकडेच, मस्क यांनी एका पोस्टमध्ये मुकेश अंबानी यांना 'पंतप्रधान अंबानी' असे संबोधून त्यांच्यावर टीका केली. या पोस्टमध्ये त्यांनी अंबानींना भारताचे खरे बॉस म्हटले आहे.

दरमहा २२०० रुपयांचा डेटा कोण खरेदी करेल? मस्क यांच्या पोस्टनंतर, काही लोकांनी निदर्शनास आणून दिले की भारतात जगातील सर्वात स्वस्त आणि वेगवान इंटरनेट आहे. महिन्याला फक्त ३००-४०० रुपयांमध्ये ६० जीबी डेटा उपलब्ध आहे, जो दुर्गम गावांमध्येही चांगला चालतो.

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचरगव्हाण येथे

# 'जागर स्त्री शक्तीचा, सन्मान मातृत्वाच्या कर्तृत्वाचा' उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचरगव्हाण येथे 'जागर स्त्री शक्तीचा सन्मान मातृत्वाच्या कर्तृत्वाचा' उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये स्त्रीशक्ती आदर आणि त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मुलांना घडविण्यात आईची भुमिका महत्त्वाची असुन शिक्षित आई घरादाराला पुढे नेणारे एक कणखर व्यक्तिमत्त्व असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष रुख्मिणी मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणुन शाळा व्यवस्थापन समिती सदस्या रुपाली पाटमासे, मुक्ता सुरजुसे, पालक उज्वला माहुरे, संध्या भडांगे, छबु घोरमाडे, मीरा मोरे विचारपिठावर विराजमान होत्या. प्रारंभी महिलांना शिक्षणाची कवाडे उघडी करुन देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले. जागृत, कृतीशील, कर्तबगार, सहकारी मातांची विविध रूपे समाजाच्या विकासासाठी आवश्यक असुन आपल्या कर्तृत्वाने जग गाजविणाऱ्या स्त्री शक्तीचा समाजाने सन्मान केला पाहिजे असे मत कार्यक्रमाच्या संयोजिका तथा शाळेच्या शिक्षिका स्वाती वानखडे यांनी व्यक्त केले. यावेळी कर्तबगार माता पालकांचा रोपटे देऊन शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. माता पालकांना दिलेल्या रोपट्यांना शाळा सुशोभिकरणासाठी शाळा परिसरात लावण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक रंजनकुमार राठोड, संचालन शिक्षिका स्वाती वानखडे तर उपस्थितांचे आभार स्मिता राऊत यांनी मानले. यावेळी चिंचरगव्हाण येथील महिला मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

# खान्देशातील बोलीभाषांच्या जतनासाठी विद्यापीठात केंद्र : शासनाकडून निधी उपलब्ध करून देणार



उदय सामंत यांची घोषणा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगाव** – खान्देशातील समृद्ध बोलीभाषांचे जतन व संवर्धन करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात येत्या सहा महिन्यांत बोलीभाषा केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या केंद्रासाठी मराठी भाषा विभागाकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी घोषणा राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांनी केली. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताह-२०२६'च्या सांगता सोहळ्यात ते बोलत होते. बुधवारी (१४ ऑक्टोबर) विद्यापीठातील ए. पी. जे. अब्दुल कलाम भवनाच्या सभागृहात हा सो-हळा उत्साहात पार पडला. मंत्री डॉ.सामंत म्हणाले की, खानदेशातील समृद्ध बोलीभाषांचे जतन करण्यासाठी यंदापासून खान्देशी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील सर्व बोलीभाषांचा शब्दसंग्रह तयार करण्याचे काम मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून हाती घेण्यात येईल.

# मोर्शीत हिंदुत्ववादी संघटनांकडून दैनिक सकाळच्या अंकांची होळी

### वादग्रस्त छायाचित्र प्रसिद्ध केल्याचा आरोप | संबंधितांवर कायदेशीर कारवाईची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**मोर्शी** – नवरात्रोत्सवा दरम्यान गरबा व दांडिया कार्यक्रमाच्या बातमीत हिंदू युवतींसोबत अन्य धर्मातील तरुणांचे छायाचित्र प्रसिद्ध केल्याच्या निषेधार्थ मोर्शी येथे हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने दैनिक सकाळच्या वृत्तपत्राच्या प्रती जाळून जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी संबंधित संपादक, पत्रकार आणि छायाचित्र तयार करणाऱ्या तंत्रज्ञाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन मोर्शी पो-लीस ठाण्यात सादर करण्यात आले.

देशभरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त विविध ठिकाणी गरबा व दांडिया कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. दरम्यान, १४ ऑक्टोबर रोजी दैनिक सकाळच्या पिंपरी-चिंचवड आवृत्तीत प्रसिद्ध झालेल्या नवरात्रोत्सवाच्या बातमीतील छायाचित्रावरून वाद निर्माण झाला आहे. हे छायाचित्र कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार करण्यात आल्याचा दावा आंदोलकांनी केला.

सदर छायाचित्र हेतुपुरस्सर प्रसिद्ध करण्यात आल्याचा आरोप विश्व हिंदू परिषदेचे धर्मप्रसार जिल्हाप्रमुख राजेश घोडके यांनी केला. अशा प्रकारच्या छायाचित्रांमुळे समाजात चुकीचा संदेश जात असल्याचे मत व्यक्त करत त्यांनी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली.

मोर्शी शहरातील प्रमुख जयस्तंभ चौकात वृत्तपत्राच्या प्रती जाळून निषेध नोंदविण्यात आला. तसेच या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, धर्म जागरण आदी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये विहिंप जिल्हा सहमंत्री परीक्षित शेंडे, धर्मप्रसार महिला प्रमुख ॲड.हर्षा बाळसराफ, मातृशक्ती महिला जिल्हाप्रमुख वृषालीताई शेंडे, बजरंग दल जिल्हा सहसंयोजक निखिल कडू, धर्मप्रसार शहरप्रमुख शुभम नरवरे, जय यादव, रवी डहारे, महेश गुजर, सोहम थोटे, जय जुवारे, दर्शन बोकड, रितिक खवले, अनिकेत गुजर, प्रज्वल काकडे, गोलू शेंडे आणि अनिश मिश्रा यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

## जाहीर नोटीस

**जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ ( २ ) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्ययाधिश, वरुड यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.१९१/२०२६** **ने.ता.३०/१०/२०२६**

**अर्जदार :-** जानराव लक्ष्मण नंदनवार
वय अं.६२ वर्ष, धंदा-मजुरी
रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-**मा.सचिव साहेब, ग्रामपंचायत कार्यालय पुसला
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांचे **मयत लक्ष्मण भगवंत नंदनवार याचा जन्म दि.१३/१२/२००४ रोजी पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) व सुधारीत ॲक्ट २०२६ चे कलम ३ (अ) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **मयत लक्ष्मण भगवंत नंदनवार याचा जन्म दि.१३/१२/२००४ रोजी पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/१०/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०९/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ ( २ ) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्ययाधिश, वरुड यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२०५/२०२६** **ने.ता.२६/१०/२०२६**

**अर्जदार :-** भागिरथी रमेश हरले (सासरचे नाव)
भागिरथी जागोजी फुले (माहेरचे नाव)
वय अं.५५ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.दापोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-**मा.सचिव साहेब, ग्रामपंचायत कार्यालय लोणी
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे भागिरथी जागोजी फुले हिचा जन्म दि.२७/०४/१९६१ रोजी लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) व सुधारीत ॲक्ट २०२६ चे कलम ३ (अ) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **भागिरथी जागोजी फुले हिचा जन्म दि.२७/०४/१९६१ रोजी लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२६/१०/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१४/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# महायुतीतील तिन्ही पक्षांचा एकमेकांना चेकमेट करण्याचा प्रयत्न?

*** अमरावतीमुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये अन पुण्यात युतीत बिघाडी**
*** आता भाजप-शिवसेनेचे दिग्गज नेते मैदानात**

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अमरावती** – राज्यातील विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीतील मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. अमरावतीमध्ये शिवसेनेच्या उमेदवारासमोर भाजपचा बंडखोर निवडणुकीच्या रिंगणात आहे.

अमरावतीत शिक्षक मतदारसंघात भाजपचे बंडखोर दिलीप



कडूंनी शिवसेनेचे अधिकृत उमेदवार किरण सरनाईक यांच्यासमोर आव्हान उभं केलं आहे. दरम्यान, महायुतीतील बंडखोरी आणि त्यामुळे मित्र पक्षामधील डोकेदुखीच्या थेट फटका भाजप-शिवसेनेच्या अधिकृत उमेदवाराला बसण्याची शक्यता आहे. परिणामी अमरावतीमधील बंडखोरी शमविण्यासाठी महायुतीचे दोन दिग्गज नेते आता मैदानात उतरले आहे.

दरम्यान, राज्याचे महसूल मंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे आणि शिवसेनेचे नेते आणि मंत्री उदय सामंत आज तातडीने अमरावतीमध्ये जाणार असल्याची माहिती आहे. तर महायुतीतील बंडखोरी शमविण्यासाठी दोन्हीं नेते प्रयत्न करणार आहेत. तर अमरावतीमधील बंडखोरी शमवण्यास यश आल्यास पुणेयाबाबत शिवसेना विचार करणार? असा प्रश्नही या निमित्याने उपस्थित झाला आहे. अशातच दोन्ही नेत्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे विधानपरिषद निवडणुकीत दोन्ही पक्षातील संबंध ताणले गेल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महायुतीतील या नेत्यांच्या शिष्टाई फळाला येते का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# सुधारित 'उडान' योजनेत महाराष्ट्राला संधी

**सोलापूर-मुंबई, अमरावती-पुणे हवाई मार्गांची निवड**

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्रातील प्रादेशिक हवाई वाहतुकीला चालना देण्यासाठी केंद्र सरकारच्या सुधारित 'उडान' योजनेअंतर्गत सोलापूर–मुंबई आणि अमरावती–पुणे या दोन हवाई मार्गांची निवड करण्यात आली आहे.

या मार्गांवर दोन्ही दिशांनी विमानसेवा सुरू करण्याचा प्रस्ताव असून, त्यामुळे सोलापूर आणि अमरावती या शहरांचा प्रमुख आर्थिक, औद्योगिक आणि



शैक्षणिक केंद्रांशी संपर्क अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे. सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी हवाई प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे आणि लहान–मध्यम शहरांमध्ये हवाई वाहतुकीचे जाळे विस्तारण्याच्या उद्देशाने 'उडान' योजना राबविण्यात येत आहे. सुधारित योजनेत राज्यांना प्रादेशिक हवाई मार्ग निश्चित करण्याच्या प्रक्रियेत अधिक सक्रिय सहभागाची संधी देण्यात आली आहे.

त्यानुसार महाराष्ट्रासाठी सोलापूर–मुंबई–सोलापूर आणि अमरावती–पुणे–अमरावती या मार्गांची निवड करण्यात आली आहे.

# दिवाळीपूर्वी एचसी मोठा निर्णय!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – नवरात्रोत्सव आणि दिवाळी तसेच ख्रिसमससह सर्वच सण–उत्सवांच्या काळात सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके फोडण्यावर आता वर्षातील सर्व ३६५ दिवस बंदी लागू राहील, असा महत्त्वपूर्ण निर्णय हायकोर्टाने दिला. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण आदेश देताना यापूर्वी गणेशोत्सवादरम्यान सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यास घातलेल्या 'बंदी'चा आदेश आता वर्षभरासाठी आणि सर्वच उत्सवांसाठी लागू राहील, असे स्पष्ट केले. सण आणि उत्सवांच्या काळात मोठ्या आवाजातील ध्वनीप्रक्षेपक, ॲम्प्लिफायर्स आणि फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाबाबत उच्च न्यायालयाने स्वतःहून (सुओमोटो ) दाखल करून घेतलेल्या जनहित याचिकेवर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

## दिल्ली आंदोलन खटला : गृहसचिवांची बिनशर्त माफी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली** – दिल्लीतील 'कॉकरोच जनता पार्टी'च्या १० ऑक्टोबरच्या आंदोलना दरम्यान मेट्रो आणि रेल्वे सेवा पूर्णपणे बंद न ठेवण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी, केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांनी सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त आणि स्पष्ट माफी मागितली आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार असून सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण आहे.

**अवैधरित्या रेतीची अवैध वाहतुक करणारा**

# डंपर जप्त : २० लाखांचा ऐवज जप्त : १ अटकेत

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – अवैधरित्या रेतीची अवैध वाहतुक करणारा रेतीचा डंपर पोलिसांनी जप्त केला असुन एकास अटक करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन शेंदुरजनाघाट हददीत पोलीस अधिकारी व अमलदार यांचे पथक पोलीस स्टेशन हददीमध्ये अवैध धंद्याचे विरुध्द कार्यवाही करणे करीता पेट्रोलिंग करीत असतांना माहीती मिळाली की, मध्यप्रदेशातील पांढुर्णाकडुन पुसलाकडे अवैधरित्या रेतीचा डंपर येत आहे, अशा माहीतीवरुन



हेकॉ.विंद्र अमृतकर, सागर लेव्हरकर, मदन उईके यांनी आरटीओ चेक पोस्ट पुसला ते पंढरी दरम्यान थांबुन पांढुर्णा कडुन येत असलेल्या डंपर क्र.एम.एच.२७ डी टी २३८५ वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये अवैधरित्या विनापरवाना कन्हान रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपी नामे रविंद्र रमेशराव वघाडे (३६) रा.पुसला याचे ताब्यातुन डंप्पर क्र.एम.एच.२७ डी टी २३८५ किंमत अंदाजे २० लाख रुपये व ६ ब्रास रेती किंमत अं. ४८ हजार असा एकुण २० लाख ४८ हजार रुपयांचा माल मिळून आल्याने आरोपी विरुध्द कलम ३०३ (२) भा.न्या.संहीता सहकलम ९, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम सहकलम ४८ (७) (८) जमीन महसुल अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधीकारी उमेश पाटील, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक ए.एन.लांडे यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सपोनि राहुल गवई, हेकॉ.विंद्र अमृतकर, सागर लेव्हरकर, मदन उईके यांनी केली.

# कवठाळ येथे कालव्यामध्ये अनोळखी वृद्धाचा मृतदेह आढळला!

**मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी शिरखेड पोलिसांचे आवाहन**

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मोर्शी** – शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कवठाळ येथे अप्पर वर्धा धरणाच्या कॅनॉलमध्ये एका अनोळखी वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून, या घटनेनंतर शिरखेड पोलिसांनी तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कवठाळ परिसरातील अप्पर वर्धा धरणाच्या कालव्यामध्ये एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच परिसरात चर्चेला उधाण आले. मृत व्यक्तीचे नाव, गाव तसेच इतर वैयक्तिक



माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या वृद्धाची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. नागरिकांना पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन सदर मृत व्यक्तीला कोणी ओळखत असल्यास किंवा त्याच्या नातेवाइकांबाबत कोणतीही माहिती असल्यास तातडीने शिरखेड पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी नागरिकांकडून मिळणारी माहिती महत्त्वपूर्ण ठरू शकते. यासंदर्भात सहाय्यक पोलीस निरीक्षक तथा शिरखेडचे ठाणेदार ईश्वर वर्गे (मो. ९५२७२४०१००) आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल तथा बीट जमादार विनोद इसळ (मो. ९४२०७०३९८९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अनोळखी वृद्धाची ओळख पटवून पुढील कार्यवाही करण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू असून, नागरिकांनी उपलब्ध माहिती पोलिसांपर्यंत पोहोचवून तपासात सहकार्य करावे, असे आवाहन शिरखेड पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.




